ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – IV December 2013

# महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजनेसाठी प्राप्त होणाऱ्या विषेश केंद्रीय सहाय्याचे मुल्यमापन

प्रा. सुर्यवंशी संतराम कोंडीबा,
पीएच. डी. संशोधक,
अर्थशास्त्र विभाग के. टी. एच. एम
कॉलेज, नाशिक.

**प्रस्तावना :**

आदिवासीची सामाजिक व आर्थिक उन्नती होऊन त्यांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने शासनाने दि. १ मे १९८३ रोजी स्वतंत्ररित्या आदिवासी विकास विभागाची निर्मीती केली आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ९.६८ कोटी असून त्यापैकी ८.८५ टक्के म्हणजेच ८५.७७ लक्ष आदिवासीची लोकसंख्या आहे. राज्यातील एकूण आदिवासींपैकी सुमारे ४९ टक्के आदिवासी क्षेत्र, माडा आणि मिनीमाडा क्षेत्रात राहतात व उर्वरित ५१ टक्के आदिवासी या क्षेत्राबाहेर राहतात. भारताच्या संविधानातील राज्य धोरणाच्या निर्देशक तत्वांच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून राज्य शासन आदिवासीच्या सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने आदिवासी उपयोजना राबवित आहे. सन १९७५ पासून म्हणजे पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभापासून प्रचलित आदिवासी उपयोजनेची सुरूवात झाली. आदिवासी लोकसंख्या जास्त प्रमाणात असलेल्या अनुसूचित क्षेत्राचे विशेष विकास गट पाडून या क्षेत्रात सर्व विभागांतर्फे जो काही विकासावर खर्च होईल त्याचे तसेच प्रामुख्याने मुलभूत सोयी उभारण्यावर होणारी गुंतवणुक याचे पुर्ण नियंत्रण आणि वेगळा हिशोब ठेवला जावा या संकल्पनेने दरवर्षी आदिवासी उपयोजनेअंतर्गत विविध विकास योजना राबविण्यात येतात. या योजनांसाठी कंद्रशासन विशेष सहाय्य देते.

**आदिवासी संकल्पना :**

इंग्रजीमधील 'Tribe' या शब्दाचा अर्थ "जमात" असा होतो. आदीपासून किंवा सुरूवातीपासून दऱ्याखोऱ्यात किंवा जंगलात निवास करणारे म्हणजे आदिवासी होय. त्यामुळेच जंगलात किंवा डोंगराळ भागात राहणाऱ्या लोकांना आदिवासी असे संबोधले जाते. डॉ. व्हेरियर इलिवन आणि ठक्कर बाप्पा यांनी आदिवासींना 'Aboriginal' असे संबोधले आहे. 'Aboriginal' याचा अर्थ मुळचे निवासी असा होतो. आदिवासी हे जंगलात किंवा डोंगराळ भागात राहतात म्हणून त्यांना "वन्यजमाती " किंवा "गिरीजन " असेही म्हटले जाते.

व्याख्या :

१. डॉ. रिव्हर्स — "जमात किंवा आदिवासी हा एक सरळ साधा सामाजिक समूह आहे. ज्यातील सदस्य एका समान बोली भाषेचा वापर करतात व युध्द वगैरे सारख्या उद्‌देशपूर्तीकरिता एकत्रित कार्य करतात"

२. गिलीन आणि गिलीन — "आदिवासी समाज हा एका विशिष्ट भूप्रदेशावर वास्तव करणार एक समान बोली भाषा बोलणारा, समान सांस्कृतीक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानीय गटाचे एकत्रीकरण आहे."

वरील व्याख्यांवरून आदिवासींचा अर्थ स्पष्ट होतो. थोडक्यात "एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणारा आणि समान जीवन पध्दती असणारा तसेच तांत्रिक ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेला समाज म्हणजे आदिवासी समाज होय."

**आदिवासी उपयोजना :**

आदिवासींची सामाजिक व आर्थीक परिस्थिती लक्षात घेऊन केंद्र सरकारने आदिवासी विकासासाठी एकात्म क्षेत्र विकास पध्दतीचा अवलंब करून १९७५—७६ साली "आदिवासी उपयोजना" तयार करण्याचे मार्गदर्शन राज्य शासनास दिले. ही आदिवासी उपयोजना देशातील सतरा राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील ठरावीक निवडक क्षेत्रांत लागु करण्यात आली. महाराष्ट्र राज्यात समाज कल्याण विभागांतर्गत आदिवासी कल्याण हा विभाग १९७२ पर्यंत कार्यरत होता. त्यानंतर महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची स्थापना केली व लगेच १९७३ साली आदिवासी कल्याण विभाग स्थापन करण्यात आला आणि १ एप्रिल १९७६ पासून या योजनेची अंमलबजावणी सुरू केली त्यामुळे विकास कार्याची दिशा केवळ कल्याणकारी योजना अशी न राहता ती विकास योजना अशी करण्यात आली. या आदिवासी उपयोजनेमध्ये महाराष्ट्र राज्यातील १५ जिल्हयातील ६८ तालुक्यातील ६९६२ गावे १३ शहरे यांचा समावेश आहे. या शिवाय ज्या गावात ५० टक्के पेक्षा जास्त आदिवासींची लोकसंख्या आहे. अशा लहान गावांची नोंद करून अशा गावांच्या समुहातील आदिवासींच्या विकासासाठी ४३ सुधारित क्षेत्र विकास गट व २४ लघुसुधारीत क्षेत्र विकास गट केंद्र सरकारने मंजूर या सर्व गटातील १६.१८ खेडयांचा समावेश या योजनेत केला आहे. १९९१ या वर्षी आदिवासी उपयोजनेच्या परिणामकारक निष्पत्तीसाठी श्री. द.म. सुखथनकर यांच्या अध्यक्षतेखाली तंज्ञांची उपसमिती नियुक्त करून त्यांनी सुचविलेल्या शिफारशीनुसार १९९३—९४ पासून राज्याची वार्षिक उपयोजना स्वतंत्रपणे तयार केली. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र प्रशासकीय यंत्रनेची नितांत गरज होती. त्यासाठी आदिवासी विकास विभाग, सहकारी आदिवासी विकास महामंडळ, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था अशा राज्य पातळीवर

वेगवेगळया कामासाठी प्रशासकीय यंत्रणा उभ्या करण्यात आल्या. त्यातूनच प्रादेशिक व जिल्हा कार्यालय निर्माण झाली व आदिवासी प्रादेशिक व जिल्हा कार्यालय निर्माण झाली व आदिवासी विकासाची स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणा अस्तित्वात आली.

**आदिवासी उपयोजनेची उद्दिष्टये :**

१. आदिवासींना लागणारा कर्जपुरवठा सहकारी पध्दतीने करणे व त्यासाठी सहकारी संस्थेचे जाळे पसरून त्याद्वारे पतपुरवठा करणे, शेती मालास योग्य भाव मिळवून देणे व त्यांच्या दैनंदिन गरजा भागविणे.
२. आदिवासी विभागात मोठया प्रमाणात कृषी आधारीत उद्योगधंदे व शेती पुरक व्यवसाय उभारण्यासाठी सर्व सोय व सुविधा निर्माण करून त्या त्यांना उपलब्ध करून देणे.
३. आदिवासींच्या वास्तव दरडोई उत्पन्नातील वाढीसाठी शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी आणि राहणीमानाचा दर्जा सुधारण्यासाठी उपयोजना करण्याच्या उद्देशाने आदिवासी उपयोजना राबविल्या जातात.
४. समाजाच्या मुख्य प्रवाहातून अलग पडलेल्या आदिवासी समाजास मुख्य प्रवाहात समाविष्ट करण्याकरिता दळणवळण साधने वाढविणे शैक्षणीक विकास घडविणे व शास्त्रीय उत्पादक पध्दतीची माहिती करून देणे.
५. सर्व स्तरावर होणारे आदिवासींचे शोषण थांबविणे, राज्यातील आदिवासीक्षेत्र व तेथील लोकांना भेडसावणाऱ्या समस्या सोडवून त्यांना संरक्षण देऊन न्या मिळवून देण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यात येतात.
६. राज्यातील आदिवासी क्षेत्र व इतर क्षेत्रे यांच्या विकासातील अंतर भरून काढणे.

**केंद्रशासनाकडून उपलब्ध झालेले सहाय्य व प्रत्यक्ष खर्चातील प्रवृत्ती :**

सामान्यत: वित्तीय लक्ष म्हणजे योजनेवर केलेल्या खर्चाचे विनियोगाशी असलेले प्रमाण होय. वित्तीय लक्ष साध्य करणे हे आदिवासी उपयोजनेच्या कार्यक्षम प्रभावी अंमलबजावणीचे प्रमुख लक्षण मानले जाते. म्हणून केंद्र सरकारने महाराष्ट्र राज्याला दिलेले विशेष सहाय्य कितपत साध्य होऊ शकले आहे यांचे विश्लेषण तक्ता क्र. १ मध्ये केले आहे. खालील तक्त्यात २००१ — ०२ ते २०१० — ११ या दहा वर्षाच्या कालावधीमधील विषेश सहाय्य व प्रत्यक्ष खर्चातील बदल दर्शविला आहे.

तक्ता क्र १

आदिवासी उपयोजनेसाठी प्राप्त होणारे विशेष केंद्रीय सहाय्य व झालेला खर्च ( रूपये कोटीत )

| वर्ष | केंद्र शासनाकडून उपलब्ध झालेले सहाय्य | झालेला खर्च | प्रत्यक्ष खर्चाची टक्केवारी | खर्च न झालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २००१ — २००२ | ३७.२४ | ३४.०० | ९१.२९ | ८.७१ |
| २००२ — २००३ | २८.३८ | २५.५३ | ८९.९५ | १०.०५ |
| २००३ — २००४ | ३३.५१ | १५.७३ | ४६.९४ | ५३.०६ |
| २००४ — २००५ | ३३.५१ | ३०.७२ | ९१.६७ | ८.३३ |
| २००५ — २००६ | ३३.५१ | १६.७५ | ४९.९८ | ५०.०२ |
| २००६ — २००७ | ३६.८६ | २५.७३ | ६९.८० | ३०.२० |
| २००७ — २००८ | ३६.८६ | ३२.७३ | ८८.७९ | ११.२१ |
| २००८ — २००९ | ४२.९३ | ४२.२९ | ९८.५० | १.५० |
| २००९ — २०१० | ४२.३४ | ४२.३४ | १००.०० | — |
| २०१० — २०११ | ५१.५५ | ५१.५५ | १००.०० | — |

**संदर्भ** — वार्षीक आदिवासी उपयोजना २००१ —०२ ते २०१०—११, महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग.

**निष्कर्ष** :

वरील तक्ता क्र. १ मधील माहितीनुसार पुढील निष्कर्ष मांडता येतील.

१. आदिवासी उपयोजनेसाठी प्राप्त होणारे विशेष केंद्रीय सहाय्य दहा वर्षाच्या काळात एकूण ३७६.६९ कोटी रू. मिळाले असून सरासरी दरवर्षी ३७.६६ कोटी रूप्ये मिळाले आहेत.

२. केंद्रीय सहाय्य खर्च झालेली एकूण रक्कम ३१७.३७ कोटी असून सरासरी प्रत्येक वर्षी ३१.७३ कोटी रूपये महाराष्ट्र शासनाने खर्च केले आहेत.

३. केंद्रीय सहाय्य खर्च न केलेली दहा वर्षाच्या कालावधी मधील एकूण रक्कम १७३.०८ कोटी रू. एवढी असून सरासरी १७.३० कोटी रू. खर्च केलेले नाहीत असे दिसून येते.

४. दहावर्षाच्या कालावधीत २०१० — ११ मध्ये सर्वात जास्त विशेष सहाय्य ५१.५५ कोटी रू. मिळाले असून सर्वात कमी २००३ —०४ मध्ये २८.३८ कोटी रू. मिळालेले दिसून येते.

५. खर्च न झालेले केंद्रीय सहाय्य सर्वात जास्त २००३ — ०४ मध्ये ५३.०६ टक्के असून सर्वात कमी २००८ — ०९ मध्ये १.५० टक्के आहे.

६. दहा वर्षाच्या कालावधीत प्रत्यक्ष खर्च सर्वात जास्त २००९ — १० व २०१०—११ मध्ये १००

टक्के करण्यात आला असून सर्वात कमी खर्च २००३ – ०४ मध्ये ४६.९४ टक्के एवढा केलेला दिसून येतो.

७. २००१ – ०२ ते २०१० – ११ या कालावधीत केंद्रीय सहाय्यामध्ये चढउतार दिसून येतो.

**शिफारशी :**

वरील तक्ता क्र १ नुसार निघालेल्या निष्कर्षानुसार खालील पुढील शिफारशी करण्यात येत आहेत.

१. योजनांची परिणामकारक फलश्रुती ही कार्यक्षम प्रशासकीय यंत्रणेवर अवलंबुन असते. म्हणून आदिवासी उपयोजना तयार करणे, नियंत्रण व परिक्षण, नियमन करण्यासाठी केंद्रसरकारने सामाजिक न्याय व अधिकार मंत्रालयात व राज्य सरकारने समाज कल्याण मंत्रालयात स्वतंत्र विभाग स्थापन करून पुरेशी प्रशासकीय यंत्रणा पुरवावी

२. केंद्रीय विशेष सहाय्य मिळण्यासाठी ग्रामीण पातळीवर प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी स्वतंत्र आदिवासी विभाग स्थापन करून योजना राबविल्या पाहिजे.

३. शासकीय उपयोजनाचे सुसूत्रिकरण करून योजनाची वारंवारिता राखणे आवश्यक आहे. सर्वसामान्य लोकांना योजनांची पुरेशी माहिती नसल्यामुळे लाभधारक योजनांपासून अलिप्त राहतात त्यामुळे त्यांना अधिकाऱ्यांनी माहिती पुरवली पाहिजे.

४. आदिवासी उपयोजनेच्या लाभार्थ्यांचा प्रस्ताव कमी वेळात मंजूर होण्याऐवजी वाजवीपेक्षा जास्त वेळ लागतो. त्यामुळे प्रकरणे लवकर मंजूर केली पाहिजेत.

५. केंद्रीय विशेष सहाय्याची रक्कम वाढवली पाहिजे म्हणजे तळागाळातील लोकांना योजनांचा लाभ मिळेल.

थोडक्यात शासनाने आदिवासी उपयोजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी, उणीवा, दोष दुर करण्यास प्राधान्य दिल्यास आदिवासी उपयोजनेला मिळालेले विशेष सहाय्याचा पुरेपुर वापर होऊ शकतो आणि त्या माध्यमातून आदिवासी समाज विकासाच्या प्रवाहात आणण्यास निश्चितच मदत होईल.

**संदर्भ :**

१. वार्षिक आदिवासी उपयोजना २००१ – ०२ ते २०१० – ११ महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग.

२. वर्मा, आर,सी, भारतीय जमाती – काल, आज आणि उद्या माहिती आणि प्रसार मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली २००३, पृष्ठ क्र. २

३. प्रदीप आगलावे “आदिवासी समाजाचे समाजशास्त्र”,श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, पृष्ठ क्र. २,३

४. Tribal Research Bulletin, Publisher, Commissioner – Tribal Research and Training Institute

Pune, Vol. XXXV No. – 2 September, 2011 P.N. 36, 38

५. ‘अर्थसंवाद’ मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक – जुलै – सप्टेंबर २००८ / खंड – ३२, अंक २, पृष्ठ क्र. १६२

६. तत्रैव – पृष्ठ क्र. ५७

७. गारे गोविंद, आदिवासी विकास योजना, आदिवासी विकास प्रतिष्ठाण पुणे.

८. नागरिकांची सनद, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई – ३०, डिसेंबर २००६ पृष्ठ क्र. ४.